0 6 JUL 2025 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# बँकिंग क्षेत्रात ग्राहकांचे महत्त्व प्रचंड : गांगल

## शिवाजी विद्यापीठात बँकिंग क्षेत्रासंबंधित एकदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बँकिंग क्षेत्रामध्ये ग्राहकांचे महत्त्व प्रचंड आहे. त्याला जे पाहिजे तशा प्रकारची सेवा देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ठाणे जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरद गांगल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र व कोल्हापूर जिल्हा नागरी बँक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांच्या सीईओ/एमडी यांच्यासाठी आयोजित मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रामअंतर्गत 'स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट फॉर यूसीबी' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते.



कोल्हापूर : बँकिंगसंदर्भातील कार्यशाळेत बोलताना शरद गांगल.

गांगल म्हणाले, सहकारी बँकामध्ये मनुष्यबळाचे महत्त्व व उपयोगिता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सहकारी बँकांचे फक्त फायनान्शियल ऑडिट होत नाही, तर त्यांचे सोशल ऑडिट होत असते. त्यामुळे फार काळजीपूर्वक राहावे लागते. आज रेपो रेट व रिव्हर्स रेपो रेट कमी केल्यामुळे पुढील चार-पाच वर्षांमध्ये उद्‌भवणाऱ्या परिस्थितीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

अध्यक्षीय मनोगतामध्ये अधिष्ठाता डॉ. महाजन म्हणाले, बँकिंग क्षेत्रामध्ये अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात होणारे बदल डिजिटल तंत्रज्ञानाची क्रांती आणि वाढलेली स्पर्धा यामुळे रणनीती व्यवस्थापनाची आवश्यकता निर्माण झाली आहे. कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स असोसिएशनचे सीईओ अनिल नागराळे यांनी प्रास्ताविक केले. गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. यावेळी अधिसभा सदस्य संजय परमणे, ८० हून अधिक अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांचे सीईओ, एमडी उपस्थित होते.

लोकमत

# दूरशिक्षण अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची बी.ए., बी.कॉम., एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम. एस्सी. (गणित), एम.बी.ए., (डिस्टन्स) तसेच एम. कॉम., एम. एस्सी. (गणित), एम.बी.ए. (ऑनलाइन), आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली. दूरशिक्षणच्या ८७ अभ्यासकेंद्रांत प्रवेशाची संधी आहे.

पुढारी

# दूरशिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेस ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी.(गणित), एमबीए (डिस्टन्स), तसेच एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एमबीए (ऑनलाईन मोड) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस दि. ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली. दूरशिक्षण शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे जे अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, अशा विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, सरकारी कर्मचारी, खासगी कंपन्या आदींना दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ८७ अभ्यास केंद्रात प्रवेशाची संधी मिळणार आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education लिंक वर प्रवेशाबाबतची जाहिरात उपलब्ध असून http:/// sukapps.unishivaji.ac.in/ studentregistration/#/ या ऑनलाईन लिंकवर प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन केले आहे.

पुढारी

# ७३५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आजअखेर ७३५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी डी. फार्मसी अभ्यासक्रमांची परीक्षा झाली. ७८ विद्यार्थी उपस्थित होते. दि. ४ रोजी बी.टेक., एम. सी. (इंजिनिअरिंग), एमए (अर्थशास्त्र), एमबीए (डिस्टन्स) यासह १५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

तरूण भारत

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठात आता बारावीनंतरही उच्च शिक्षणाची संधी !

**सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभागात १२ वी नंतर खालील विविध पदवी/ एकात्मिक/ आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.**

- B.A. Film Making
- B.A.-Sports
- B.Com (B.F.S.I.)
- B.Sc.-M.Sc. Nanoscience & Technology (Integrated 5 years Programme)
- B.Sc.-M.Sc. Economics (Integrated 5 years Programme) (CET)
- B.Sc.-M.Sc. (AI & ML)
- B.C.A. (Science), (Govt. CET)
- B.B.A/M.B.A. ( Integrated 5 years Programme),
- B.Sc.-B.Ed. (Integrated 4 years Programme), (NTA-CET Required),
- **B. Tech** (Govt. CET)
  Computer Science and Technology, Chemical Engineering, Civil Engineering, Electronics and Telecommunication Engineering, Food Technology, Mechanical Engineering.
- **M. Tech** (Govt. CET)
  Computer Science and Technology, Energy Technology, Environmental Science and Engineering, Electronics and Telecommunication Engineering, Food Technology.
- **Yashwantrao Chavan School of Rural Development Course-**
  M.R.S., M.S.W., M.C.A. (Govt. CET), M.B.A., M.Tech.
- **LL.M.**
- **BJ, MJ, M.A.** (Mass Communication),
- **M.C.A.** (Computer Science)
- **B.Ed.-M.Ed.** (3 Years Integrated), **M.Ed.**

**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये उपलब्ध अभ्यासक्रम**

**Distance Education**

**B.A., B.Com.**
**M.A.-** Marathi, Hindi, English, History, Economics, Political Science and Sociology,
**MBA., M.Sc. (Maths.) & M.Com**

**Online Education**

M.B.A. (Online), M.Com, & M.Sc.(Maths)

**याखेरीज खालील नियमित अभ्यासक्रमही विद्यापीठात उपलब्ध -**

- **M.Sc. Regular Courses**
  Chemistry (Analytical/Physical/Organic/In-Organic/Industrial/Applied), Biochemistry, Botany, Zoology, Mathematics, Mathematics with Computer Application, Physics, Computer Science, Electronics, Economics, Agro Chemical & Pest Management, Environmental Science, Statistics, Applied Statistics, Microbiology, Pharmaceutical Microbiology, M.A./ M.Sc. Geography, Biotechnology, Food Science & Technology, Nano-Science & Technology, Geo-informatics, Medical Information Management.
- **M.A. Regular Courses**
  Marathi, Hindi, Bhasha Pradyogiki, English, History, Economics, Political Science, Sociology, Psychology, Russian Language, Women's Studies, Dramatics, Music, M.A. Yogashastra.
  M.A. Travel & Tourism

सदर अभ्यासक्रमांसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासक्रमासाठी https://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information व दूरशिक्षण अभ्यासक्रमासाठी https://sukapps.unishivaji.ac.in/stud-reg/#/login या लिंकवर संपर्क साधावा. उपरोक्त अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भात अद्ययावत माहिती वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) प्रसिध्द करण्यात येईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

- सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाकडून विशेष सवलत योजनाही राबविण्यात येत आहे. त्यासाठी https://www.unishivaji.ac.in/mscadmission/Border-Area-Admission-Rules-And-Village-List या लिंकला भेट द्यावी.

ठिकाण : कोल्हापूर
दि. ०६/०७/२०२५

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव